| MHNG080000512019 | दाखल तारीख | ०५/०१/२०१९ | | |
|---|---|---|---|---|
| | नोंदणी तारीख | ०५/०१/२०१९ | | |
| | निकाल तारीख | ०५/०५/२०२६ | | |
| | कालावधी | वर्ष | महिने | दिवस |
| | | ०७ | ०४ | ०० |

<u>कामठी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२ कामठी यांचे न्यायालयात</u>

**(पिठासीन अधिकारी रा.र.शेरेकर)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२२/२०१९** **नि.क्र.५५**

**(पोलीस स्टेशन कन्हान येथील गुन्हा नोंद क्र.१८५/२०१८ भारतीय दंड संहिता कलम ३४१, २९४ व ५०६ सहकलम ३४ अन्वये )**

| | | |
|---|---|---|
| **सरकार पक्ष/फिर्यादी** | | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस स्टेशन कन्हान,<br>ता. पारशिवनी, जि. नागपुर. |
| **सादरकर्ते** | | सहायक सरकारी अभियोक्ता<br>श्री. एम.एम.पंचारीया |
| **आरोपी** | १. | **अजय अमरसिंग राजगीरे उर्फ यादव**<br>वय ३९ वर्षे, व्यवसायः शेती |
| | २. | **मोहन अमरसिंग राजगीरे उर्फ यादव**<br>वय ३५ वर्षे, व्यवसायः शेती |
| | ३. | **पप्पु अमरसिंग राजगीरे उर्फ यादव**<br>वय ३७ वर्षे, व्यवसायः शेती |
| | ४. | **शेखर मोतीलाल राजगीरे उर्फ यादव**<br>वय २४ वर्षे, व्यवसायः शेती<br>सर्व रा. डुंभरी स्टेशन, कन्हान, ता.पारशिवणी, जि. नागपूर |

| | | |
|---|---|---|
| **सादरकर्ते** | | श्री. पंकज यादव |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १९.०५.२०१८ |
| फिर्याद दाखल तारीख | २१.०५.२०१८ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | ०५.०१.२०१९ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | १५.०१.२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १२.०१.२०२३ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | .. |
| निकालाची तारीख | ०५.०५.२०२६ |
| शिक्षा झाल्याची तारीख, शिक्षा झाली असेलतर. | --- |

| **आरोपीचा अनुक्रमांक** | **आरोपीचे नाव** | **अटक केल्याची तारीख** | **जामीन झाल्याची तारीख** | **कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले** | **शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त** | **काय शिक्षा दिली** | **फौजदारी प्र.संहितेच्या कलम ४२८ साठी खटला सुरु असताना आरोपीचा कारागृहातील कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अजय अमरसिंग राजगीरे उर्फ यादव | २२.०५.२०१८ | २२.०५.२०१८ | भारतीय दंड संहिता कलम ३४१,२९४ व ५०६ सहकलम ३४ | निर्दोष मुक्त | .. | .. |
| २. | मोहन अमरसिंग राजगीरे उर्फ यादव | २२.०५.२०१८ | २२.०५.२०१८ | वरील प्रमाणे | निर्दोष मुक्त | .. | .. |
| ३. | पप्पु अमरसिंग राजगीरे उर्फ यादव | २२.०५.२०१८ | २२.०५.२०१८ | वरील प्रमाणे | निर्दोष मुक्त | .. | .. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | शेखर मोतीलाल राजगीरे उर्फ यादव | २२.०५.२०१८ | २२.०५.२०१८ | वरील प्रमाणे | निर्दोष मुक्त | .. | .. |

**<u>सरकारपक्षाचे साक्षीदार</u>**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | प्रेमसागर लालजी सिंग | पंच साक्षिदार |
| २ | संतोष इंदीराचंद यादव | साक्षिदार |
| ३ | नितीन भगवान आगासे | तपासी अधिकारी |

**<u>सरकारपक्षाचा कागदोपत्री पुरावा</u>**

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | २५ | समन्स |
| ०२. | २६ | घटनास्थळ पंचनामा |
| ०३. | २७ | सा.क्र.०२ संतोष यादव याचे बयान |

**बचावपक्षाचे साक्षीदार–काही नाही**
**न्यायालयाने दिलेले निशानी क्रमांक–काही नाही**
**जप्त मुद्देमाल– काही नाही**

-:- न्यायनिर्णय -:-
(घोषित दिनांक–०५.०५.२०२६)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम (संक्षिप्त 'भा.द.वि.') ३४१, २९४ व ५०६ सहकलम ३४ प्रमाणे शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यासाठीचा खटला चालविणेत आला.

**<u>अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात पुढीलप्रमाणे</u>** –

२. दिनांक २१.०५.२०१८ रोजी फिर्यादी मोहम्मद हारुन याने पोलीस स्टेशनला फिर्याद दिली की, ते डब्लुसीएल येथे सुरक्षा इंचार्ज या पदावर कार्यरत असून

दिनांक १९.०५.२०१८ रोजी सकाळी ८.४५ वाजताच्या सुमारास डुमरी सायडिंग रोडवर त्याचे डब्लुसीएलचे कोळश्याचे ट्रक जात होते. तेव्हा आरोपींनी त्याचे ट्रक थांबविले आणि म्हणाले की 'ट्रक आगे जायगे नही'. त्यामुळे ट्रक चालकाने ट्रक थांबविले. त्यानंतर डुमरी इंजार्च सावंगी साहेब व कपूर साहेब तेथे गेले तेव्हा आरोपींनी त्या दोन्ही साहेबांना शिवीगाळ केली. तेव्हा तो तेथेच होता. त्यानंतर आरोपी क्र.१ ने कपूर साहेब यांना 'तेरी मॉ को चोदू मादरचोद, तुम यहा आना नही, तु साले यहा पे आना नही, नही तो जान से मार दुंगा' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. म्हणुन फिर्यादीने पोलिस स्टेशन कन्हान येथे आरोपींविरुध्द भा. दं. वि. कलम ३४१, २९४ व ५०६ सहकलम ३४ नुसार फिर्याद दाखल केली.

**३.** दाखल फिर्यादवरुन गुन्हा क्र.१८५/२०१८ नोंदवणेत आला. त्यानंतर तपास अधिकारी यांनी तपास पूर्ण करुन आरोपींविरुध्द भा.दं.वी.कलम ३४१, २९४ व ५०६ सहकलम ३४ प्रमाणे दोषारोप पत्र दाखल केले.

**४.** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द नि.क्र.२ नुसार भा.दं.वी.कलम ३४१, २९४ व ५०६ सहकलम ३४ अंतर्गत दंडनीय अपराधाकरीता दोषारोप निश्चित केले. आरोपींनी त्यांची प्रतीकथने नि.क्र.०३ ते ०६ अन्वये त्यांच्याविरुध्द ठेवण्यात आलेले आरोप नाकारुन सुनावणीची मागणी केली, म्हणुन संपरीक्षा पुढे चालविण्यात आली.

**५.** अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेल्या पुराव्यामध्ये आरोपींविरुध्द गुन्हादर्शक पुरावा आढळुन आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ नुसारचा जवाब नि.क्र.५० ते ५३ कडे नोंदविण्यात आले. आरोपींनी त्यांच्याविरुध्द खोटी केस केल्याचा बचाव घेतला. अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता व आरोपींच्या विधीज्ञांचा

युक्तीवाद ऐकला.

**६.** संपूर्ण पुरावा व दोन्ही बाजुचा युक्तीवाद पाहता खटल्याच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले. त्या प्रत्येक मुद्यावर कारणांसहीत उत्तरे खालीलप्रमाणेः–

| **अ.क्र** | **मुद्दे** | **उत्तर** |
|---|---|---|
| १. | दिनांक १९.०५.२०१८ रोजी ८.४५ ते १३.४५ वाजताच्या दरम्यान रेल्वे स्टेशन सायडींग रोड, डुमरी, कन्हान येथे आरोपींनी आपसात संगणमत करून डब्लुसीएलचे कोळश्याने भरलेल्या ट्रकचे जाण्या येण्याचे मार्ग बंद करून वाहतुकीस अडथळा निर्माण केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | ...नाही. |
| २. | वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगणमत करून इंचार्ज साहेब सुनील कपूर व राकेश सावंगी यांना 'तेरी मॉ को चोदु, मादरचोद साले तुम यहा पर आना नही, नही तो जान से मार देंगे' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | ...नाही. |
| ३. | वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगणमत करून इंचार्ज साहेब सुनील कपूर व राकेश सावंगी यांना मारण्याची धमकी दिल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | ...नाही. |
| ४. | काय आदेश ? | **...आरोपींना निर्दोष मुक्त केले.** |

## –:– <u>कारणमिमांसा</u> –:–

**७.** आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करणेसाठी अभियोग पक्षाने पंच सा. क्र.१ प्रेमसागर लालजी सिंग यांची साक्ष नि.क्र.०२ लगत, सा. क्र.२ संतोष इंदीराचंद यादव यांची साक्ष नि.क्र.२० कडे व तपासी अधिकारी सा. क्र.३ नितीन भगवान आगासे यांची साक्ष नि.क्र.२४ कडे नोंदविली. त्यानंतर नि.क्र.०१ खाली आदेश पारीत करून अभियोग

पक्षाचा पुरावा बंद केला. आरोपींनी त्यांच्या बचावा प्रित्यर्थ कोणताही पुरावा नोंदविला नाही.

**मुद्दे क्र.१ ते ३ बाबतः–**

८. भारतीय दंड विधान संहिता कलम ३४१, २९४ व ५०६ सहकलम ३४ नुसार आरोपी वरील गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने आरोपींनी आपसात संगणमत करून डब्लुसीएलचा कोळश्याने भरलेल्या ट्रकचे जाण्या येण्याचे मार्ग बंद करून वाहतुकीस अडथळा निर्माण केला, इंचार्ज साहेब सुनील कपूर व राकेश सावंगी यांना 'तेरी मॉ को चोदु, मादरचोद साले तुम यहा पर आना नही, नही तो जान से मार देंगे' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली व इंचार्ज साहेब सुनील कपूर व राकेश सावंगी यांना मारण्याची धमकी दिली ही बाब शाबीत करणे गरजेचे आहे.

९. सा. क्र.१ प्रेमसागर हा पंच साक्षिदार आहे. त्याने त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, दिनांक २१.०५.२०१८ रोजी पोलीसांनी त्याला कुठेही बोलविले नव्हते. त्याची एका कागदावर सही घेतली होती. त्याने पंचनाम्यावर त्याची सही नि.क्र.१६ असल्याचे मान्य केले, परंतु त्यातील मजकूर त्याला माहित नसल्याचे कथन केले. सदर साक्षिदाराने अभियोग पक्षास सहाय्य केले नाही त्यामुळे सरकारी वकीलांनी त्याला उत्तरसुचक प्रश्न विचारले परंतु अभियोग पक्षास सहकार्य होईल असे कुठलेही कथन त्याने केले नाही.

१०. सा. क्र.२ संतोष याने त्याच्या पुराव्यात कथन केले की, दिनांक १९.०५.२०१८ रोजी तो कामठी खदान येथे सेक्युरिटी गार्ड म्हणून कार्यरत होता. मो. हारून हे सेक्युरिटी इंजार्च होते. ते सध्या निवृत्त झाले आहे व ते त्यांच्या मुळ गावी शिवणी, मध्यप्रदेश येथे राहत आहे. दिनांक १९.०५.२०१८ रोजी त्यांना माहिती मिळाली की डुंबरी येथे कोळश्याच्या गाड्या थांबवलेल्या आहेत. त्यानंतर हारून यांनी त्यांना बोलावले. ते

घटनास्थळी गेले. त्या ठिकाणी बरेच लोक होते. तेथे शिवीगाळ चालू होती. कोणी कोणाला शिवीगाळ केली हे त्याला आठवत नाही. सदर साक्षिदाराने अभियोग पक्षास सहाय्य केले नाही त्यामुळे सरकारी वकीलांनी त्याला उत्तरसुचक प्रश्न विचारले परंतु अभियोग पक्षास सहकार्य होईल असे कुठलेही कथन त्याने केले नाही.

**११.** सा. क्र.३ नितीन आगासे हे तपासी अधिकारी असून यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले आहे की, दिनांक २१.०५.२०१८ रोजी ते पोलीस स्टेशन कन्हान येथे नेमणुकीस होते. त्या दिवशी त्यांच्याकडे गुन्हा क्र. १८५/२०१८ चा तपास देण्यात आला. त्यांना तपास डायरी, एफ.आय.आर व तोंडी रिपोर्ट मिळाले होते. त्यानंतर त्यांनी दोन पंचांना नि.क्र.२५ कडील समन्स देवून त्यांचे समक्ष घटनास्थळ पंचनामा नि.क्र.२६ तयार केला. त्यानंतर आरोपींना अटक केली. त्यानंतर त्यांनी फिर्यादी व साक्षिदारांचे बयाण नोंदविले. साक्षिदार क्र.२ संतोष यादव यांचा नि.क्र.२७ कडील बयाण त्यांनी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला होते. त्यानंतर तपासाअंती आरोपींविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

**१२.** आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, घटनास्थळी लोकांची घरे व वस्ती आहे व या कामातील पंच हे घटनास्थळावरील नसुन दुस–या ठिकाणचे आहे. त्यांनी मान्य केले की, घटनास्थळावरून बरेच ट्रक येत जात राहतात व घटनास्थळावरील स्वतंत्र साक्षिदारांचे बयान याकामी नोंदविले नाही. इतर प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली.

**१३.** अभिलेखावरील एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, तपासी अधिकारी यांनी जरी त्यांच्या पुराव्यात त्यांनी पंच साक्षिदारांसमक्ष घटनास्थळ पंचनामा नि.क्र.२६ तयार केल्याचे कथन केले असले तरी स्वतंत्र पंच

साक्षिदाराने कथन केले की पोलीसांनी केवळ त्याची एका कागदावर सही घेतली होती. याचाच अर्थ पोलीसांनी सदर साक्षिदारासमक्ष कुठलाही पंचनामा तयार केला नव्हता. प्रकरणातील दुसरा पंच साक्षिदार नि.क्र.४३ वरील अहवालानुसार मिळून आलेला नाही. त्यामुळे सदर कामी केवळ तपासी अधिका–याच्या कथनावर विश्वास ठेवून घटनास्थळ पंचनामा त्यांनी घटनास्थळी जावून तयार केला होता यावर विश्वास ठेवता येणार नाही. त्यामुळे याकामी घटनास्थळ पंचनामा शाबीत झालेला नाही.

**१४.** सदर प्रकरणातील महत्वाचे साक्षिदार जसे की, फिर्यादी मो. हारून, राकेश सावंगी व सुनील कपूर हे नि.क्र.४६,४४ व ४७ वरील अहवालानुसार मिळून आलेले नाही. सदर साक्षिदारांचा पुरावा आरोपींविरुध्दचा गुन्हा शाबीत करण्यासाठी महत्वाचा होता. परंतु अभियोग पक्ष त्यांना पुराव्याकामी हजर ठेवू शकला नाही. त्यामुळे आरोपींविरुध्द अभिलेखावर कोणताही पुरावा आलेला नाही.

**१५**. फौजदारी खटल्यांमध्ये आरोपींविरुध्दचा गुन्हा विनाशंका शाबीत होणे गरजेचे आहे. परंतु वर नमुद केल्याप्रमाणे अभिलेखावर आरोपींविरुध्द सबळ पुरावा आलेला नाही. त्यामुळे सदरकामी आरोपींना प्रस्तुत गुन्हयात गोवणारा कोणताही पुरावा न आल्यामुळे आरोपी हे संशयाचा फायदा मिळण्यास पात्र ठरतात. आरोपींनी भा.द.वि.कलम ३४१,२९४ व ५०६ प्रमाणे गुन्हा केल्याचे शाबीत न झाल्यामुळे आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. म्हणुन मी मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** आरोपी क्र. १ अजय अमरसिंग राजगीरे उर्फ यादव, आरोपी क्र.२ मोहन अमरसिंग राजगीरे उर्फ यादव, आरोपी क्र.३ पप्पु अमरसिंग राजगीरे उर्फ यादव व आरोपी

क्र.४ शेखर मोतीलाल राजगीरे उर्फ यादव यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये भारतीय दंड विधान संहिता कलम ३४१,२९४ व ५०६ मधील आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींची जमानतीची बंधपत्रे रद्द करण्यात येत आहे व त्यांच्या जमानतदारांना मुक्त करण्यात येत आहे.

३. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) चे तरतुदीची पुर्तता करणेसाठी आरोपींनी प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्रे पुढील सहा महिन्याचे कालावधीकरिता द्यावे.

(येणेप्रमाणे खुल्या न्यायालयात उद्घोषित)

RAJESH RAMESHRAO SHEREKAR

Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2026.05.05 16:14:47 +0530

कामठी.
दिनांक :०५.०५.२०२६

(रा.र. शेरेकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, कामठी

**–: प्रमाणपत्र :–**

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. निकालपत्र आदेश यामधील सर्व मजकूर मूळ निकालपत्र आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | सौ. परिणीता अ. निर्मल |
| न्यायालयाचे नांव | रा.र.शेरेकर<br>(प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी, न्यायालय क्र. २ कामठी) |
| टाईप केल्याचा दिनांक | ०५.०५.२०२६ |
| न्यायिक अधिका–यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | ०५.०५.२०२६ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | ०५.०५.२०२६ |